# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## Internship Programme

**The Urban Learning Internship Programme** अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडे **०१** उच्च श्रेणी स्टेनोग्राफर **व ०१** कनिष्ठ श्रेणी स्टेनोग्राफर (शिकाऊ उमेदवार) नेमण्याचे आहेत. सदरची नियुक्ती ही १ वर्षाच्या कालावधीकरिता असून, ही नेमणुक **The Urban Learning Internship Program (TULIP)** या माध्यमाकडुन नोंदणीकृत उमेदवारांमधुन करण्यात येणार आहे. तरी उच्च श्रेणी स्टेनोग्राफर **व** कनिष्ठ श्रेणी स्टेनोग्राफर साठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी **The Urban Learning Internship Program (TULIP) internship.aicte-india.org** या संकेतस्थळावर आपल्या नावाची नोंदणी दिनांक २ नोव्हेंबर २०२२ पर्यत करावी.

**१.** उच्च श्रेणी स्टेनोग्राफर या पदासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

१. कोणत्याही शाखेचा पदवीधर.
२. मराठी लघुलेखनाची गती १२० श.प्र.मि.
३. मराठी टंकलेखनाची गती ३० श.प्र.मि.व इंग्रजी गती ४० श.प्र.मि.
४. तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
५. वरील पदवीचे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

**२.** कनिष्ठ श्रेणी स्टेनोग्राफर या पदासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

१. कोणत्याही शाखेचा पदवीधर.
२. मराठी लघुलेखनाची गती १०० श.प्र.मि.
३. मराठी टंकलेखनाची गती ३० श.प्र.मि.व इंग्रजी गती ४० श.प्र.मि.
४. तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
५. वरील पदवीचे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

**The Urban Learning Internship Program (TULIP) याबाबतची सविस्तर माहिती व अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१) The Urban Learning Internship Program (TULIP) यांचे Internship.aicte-india.org हे संकेतस्थळ आहे.
२) शिकाऊ उमेदवार म्हणून उच्च श्रेणी स्टेनोग्राफर व कनिष्ठ श्रेणी स्टेनोग्राफर यांचे मानधन रक्कम रुपये १०,०००/- मात्र इतके असेल.
३) The Urban Learning Internship Program (TULIP) यांचेकडील ज्या अटी / शर्ती असतील त्या नियुक्त केलेल्या शिकाऊ उमेदवारास लागू राहतील.
४) शिकाऊ उमेदवार हा पदवी / स्टेनोकार्सची अंतीम परिक्षा उत्तीर्ण झालेपासून १८ महिनेपेक्षा कमी कालावधी झालेला असावा.
५) शिकाऊ उमेदवारांचे अर्ज फक्त वर नमूद **Internship.aicte-india.org** या पोर्टलव्दारेच स्विकारले जातील. ऑफ लाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
६) कालावधी समाधानकारक पूर्ण करणाऱ्या उमेदवारास महानगरपालिकेकडून प्रमाणपत्र देण्यात येईल.
७) सदर पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झालेस शिकाऊ उमेदवाराची नियुक्ती गुणानुक्रमे करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
८) नियुक्ती शर्ती / अटी यामध्ये बदल करणे, कमी अधिक मजकूर इत्यादी बदल वा संपूर्ण प्रक्रिया रद्द करणेचे अधिकार मा.आयुक्त यांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

२४/११

(राहुल रोकडे)
उपायुक्त, (मुख्यालय)
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

क्र.मनपा/आस्थावि / १८५७ /२०२२-२३
सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका
दिनांक २४/११/२०२२